

# गीतधारा

सौ. सरस्वती जलतारे
आकोट

(श्री नरसिंग प्रिंटर्स, आकोट)

# मातोश्री प. पू. कृष्णाबाई देशमुख
## यांचे पवित्र स्मृतीस



— श्री. सरस्वती मलतारे
आकोट

# – प्रस्तावना –

माझी भावजय सौ. सरस्वती हिच्या काही कविता तिने रचलेल्या आरत्या आणि मंगलाष्टके पुस्तक रुपात प्रसिद्ध होत आहे. ह्या संग्रहाला मी प्रस्तावनेच्या रुपाने दोन शब्द लिहून आशिर्वाद द्यावेत असे सांगितल्यावरुन मी थोडेसे लिहायचे कबूल केले.

सौ. सरस्वतीच्या आसपासच्या परिस्थितीमुळे ती एवढे उत्तम काव्य करीत असेल याची कल्पनाही येणे कठीण माहेरी आणि सासरी दोन्हीही घरी काव्य किंवा साहित्याच्या निर्मितीसाठी अनुकूल वातावरण नव्हते. माहेरी कुणी विशेष शिकलेले नाही तर सासरी पोलीस अंमलदार पतीच्या सहवासात काव्याला स्थान नाही ही स्थिती पतीचा स्वभाव अत्यंत तापट व शिस्त कडक. परंतु वडील मित्र कवि होते. त्यांच्याच काव्यामुळे मनात स्फुल्लींग पडले असावे. पण ते जतन करुन ते सतत तेवत ठेवण्याचे व्रत जन्मभर जोपासणे म्हणजे तारेवरची कसरतच होती. अशा वातावरणात आपल्या प्रतिभेचा आविष्कार गाणी, आरत्या, मंगलाष्टके या सारख्या पारंपारिक काव्यातून लोकांच्या नजरेला आणून देण्याचे कठीण काम सौ. सरस्वतीने केले हे विशेष.

ह्या संग्रहात कविता आहेत. त्या उत्कृष्ट काव्याचे नमुनेच म्हणता येतील. हलक्या दर्जाच्या गाण्यातुन आणि विविध लग्न प्रसंगा केलेल्या मंगलाष्टकातून दिलेली पारिवारिक माहिती फार उपयोगी आहे. विशेषतः आजच्या पिढीसाठी म्हणून हा संग्रह संग्रहणीय झाला आहे.

ह्या संग्रहाला यश किर्ती लाभो व वाचकांना त्यापासून आनंद होवो हीच कामना !

अण्णासाहेब जळतारे
शिरडी

# मनोगत

माझ्या ह्या बोबड्या बोलांचा भावसंग्रह माझ्या पूज्य मातोश्री कै. जिजी उर्फ कृष्णाबाई देशमुख यांचे स्मृतीस अर्पण करताना माझे मन भरून येत आहे. तिने दिलेली स्फुर्तीची व प्रेमाची शिदोरी माझ्या संसारात पुरून उरली आहे. म्हणून ही भावपुष्पांची आदरांजली तिला समर्पित करीत आहे.

माझे ज्येष्ठ दीर श्री अण्णासाहेब अलतारे यांच्या प्रेमळ आग्रहावरून व आत्यंतिक इच्छेमुळे माझ्या गीतांचा संग्रह करून छोटेसे पुस्तक छापण्यात आले त्यांनी माझे जे कौतुक केले ते शब्दात मी सांगू शकत नाही. मी अशिक्षीत व त्या काळच्या स्त्री शिक्षणाच्या विरोधात वाढलेली. परंतु मुला-मुलींच्या, सुना-नातवंडांच्या, नाती-जावयांच्या व आनंदाचे शिखर म्हणजे पणतुंच्या अतीव आनंदामुळे क्रमशः भावना जागृत होऊन प्रत्येकाचे जीवनातील मंगल प्रसंगी काही तरी भाव काव्यांत उमटविण्याचा प्रयत्न झाला. माझ्या संसारातील प्रत्येक व्यक्तीच्या वाढत्या उत्कर्षाचा हा अणु माहितीपट आहे. माझी मुले-सुना, लेकी, जावई, नातू-नाती, पणतु यांना माझा शुभाशिर्वाद !

तसेच श्री अण्णासाहेब अलतारे यांनी सर्व गीते एकत्रीकरण करण्याची स्फुर्ती व कल्पना दिली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे त्यांचे कृपाछत्र आमच्या शीरावर आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे. त्यांना दीर्घायु लाभो ही परमेश्वराजवळ प्रार्थना !

माझी कन्या सौ. कुमुद भीष्म व जावई श्री यशवंतराव भीष्म यांनी यापूर्वी सर्व गीते टाईप करुन ते एकत्रीत केले व ते पुस्तक बाईंडींग करुन मला भेट म्हणून दिले होते. त्यावेळी त्या उभयतांचे कौतुक केल्या-शिवाय मला रहावत नाही. या पुस्तकाला 'गीतधारा' हे नांव त्यांनीच दिले आहे. तेच मी कायम ठेवले.

तसे सहकार्य मला सर्वांचेच मिळाले परंतु या कवितांचे एकत्रिकरण करणे, व्यवस्थीत क्रम लावून ते जोडणे या कामात माझा ज्येष्ठ मुलगा चि. वसंत व ज्येष्ठ सून सौ. सुहास तसेच सौ. सुधा बोंद्रे, सौ. सिंधू पंचभाई, सौ. प्रमोद देशपांडे व माझे पती यांनी विशेष परि-श्रम घेतले मुलांना शुभाशिर्वाद !

काव्यात चुका आहेत हे मान्य करुन या अल्पमतिला क्षमा असावी. हे मागणे !

सौ. सरस्वतीबाई जलतारे
आकोट

## अनुक्रमणिका


| अ. नं. | | पेज नं. |
|---|---|---|
| १) | भूपाळी श्री नारायण गुरूंची | १ |
| २) | श्री गजानन महाराजांचे पद | २ |
| २) | शारदास्तवन | ३ |
| ४) | श्री नरसिंग महाराजांचे पद | ४ |
| ५) | केशवराजाचे पद – १ | ५ |
| ६) | केशवराजाचे पद – २ | ६ |
| ७) | विठूराणा | ७ |
| ८) | श्री नारायणगुरु महाराजांचे अभंग | ८ |
| ९) | दृष्ट कृष्णाची | ९ |
| १०) | मुरली –– रुक दे शाम | १० |
| ११) | वाजविली वंशी (मुरली) | ११ |
| १२) | मोहन वाजवी मुरलीला (मुरली) | १२ |
| १३) | शामसुंदरा, ये ये श्रीधरा (नवनीत साखर) | १३ |
| १४) | आरती श्री नारायण गुरूंची | १४ |
| १५) | आले भूवरी श्रीगुरु (अष्टक) | १५ |
| १६) | ये मनमोहन नंदलाला (गोपाळकाला) | १६ |
| १७) | ये हासत ये (लूट) | १७ |
| १८) | प्रवीणा, लूट तुझी (लूट) | १८ |
| १९) | मंगलाष्टक (भोजने) | १९ |
| २०) | मातृभोजन (अरुण देशपांडे) | २० |
| २१) | चि. बाबुराव व बाबा यांचे शुभविवाह प्रसंगी मंगलाष्टक | २१ |
| २२) | चि. सुरेश व मंगला (मंगलाष्टक) | २२ |
| २३) | चि. प्रमो[illegible] व विजय देशपांडे | २३ |
| २४) | चि. च[illegible] जलतारेच्या शुभविवाह प्रसंगी | २४ |

अनुक्रमणिका


| क्र. नं. | | | पेज नं. |
|---|---|---|---|
| २५) | चि. पद्मजा व शामकांत तारे यांचे विवाह प्रसंगी | | २५ |
| २६) | चि. शैलजा व डॉ. सुनिल लुले यांचे —,,— | | २६ |
| २७) | चि. प्रविण व चि. माया यांचे —,,— | | २७ |
| २८) | चि. स्मिता व मिलिंद पुराणकर यांचे —,,— | | २८ |
| २९) | आजोबांचे स्मिताला आशिर्वाद | | २९ |
| ३०) | व्हिहीण | सौ सुहास व सौ सुनिता | ३० |
| ३१) | व्हिहीण | सौ सिंधुचे विवाह प्रसंगी | ३१ |
| ३२) | व्हिहीण | सौ. सुनंदा | ३२ |
| ३३) | व्हिहीण | सौ. प्रमोद | ३३ |
| ३४) | डोहाळे | सौ. सुहास व सौ. सुनिता | ३४ |
| ३५) | डोहाळे | सौ. सिंधु पंचभाई | ३५ |
| ३६) | डोहाळे | सौ. कुमुद धीरन | ३६ |
| ३७) | डोहाळे | सौ. प्रमोद देशपांडे | ३७ |
| ३८) | पाळणा | चि. प्रविण जलतारे | ३८ |
| ३९) | पाळणा | चि शैलजा | ३९ |
| ४०) | पाळणा | चि. सुधीर पंचभाई | ४० |
| ४१) | पाळणा | चि सुनिल शिंदे | ४१ |
| ४२) | पाळणा | चि. माधुरी पंचभाई | ४२ |
| ४३) | पाळणा | चि. जयंत जलतारे | ४३ |
| ४४) | पाळणा | चि. अमर जलतारे | ४४ |
| ४५) | पाळणा | चि. आनंद देशपांडे | ४५ |
| ४६) | पाळणा | चि. अजिक्य जलतारे | ४६ |

| अ. नं. | | पेज नं. |
| --- | --- | --- |
| ४७) | पाळणा चि. सुभ्रा जलतारे | ४७ |
| ४८) | पाळणा चि. सुश्रुतचा | ४८ |
| ४९) | पाळणा चि. अनिरुद्ध जलतारे | ४९ |
| ५०) | रंगपंचमी सुधीर पंचभाई | ५० |
| ५१) | चि. सुरेश यांस संदेश | ५१ |
| ५२) | धावा द्रौपदीचा | ५२ |
| ५३) | मंगलाष्टक चि. सुनिल व मीनल | ५३ |
| | —"— —"— | ५४ |
| ५४) | गौरीहर | ५५ |
| ५५) | विहीण सुधा बक्षी | ५६ |
| ५६) | कृष्णाच्या मौंजीचे मंगलाष्टक | ५७ |
| ५७) | कै. सौ. जानकीबाई जलतारे यांना श्रद्धांजली | ५८ |
| ५८) | श्री दाजीसाहेब जलतारे यांचे सहस्रचंद्रदर्शनाचे प्रसंगी | ५९ |
| ५९) | श्री दाजीसाहेबांचे घर | ६० |
| ६०) | बाबांची एकसष्टी | ६१ |
| ६१) | नातु | ६२ |
| ६२) | चि. वसुधा व चि. विनोद मंगलाष्टके | ६३ |
| ६३) | चि. मोहन व सौ. शुभदा यांचे विवाह प्रसंगी | ६४ |
| ६४) | चि विनेश देशमुख याचा पाळणा | ६५ |
| ६५) | पणतु [प्रतिक] | ६६ |
| ६६) | पणतु | ६७ |
| ६७) | डोहाळे | ६८ |

(१)

# भूपाळी


( श्री नारायण गुरुंची )

उठा श्रीगुरु प्रभात झाली, नारायण गुरु हरि ।
तिमिर संपला उषा प्रगटली, रवि उदया येई ॥ध्रु॥

दर्शन घ्याया व्दारी उभे आम्ही, जोडूनी बद्धांजली ।
मुख प्रक्षाळूनी नवनीत साखर, खावें दूध केशरी ॥
(उंच चाल) अमरपुरी वासिनी देवीच्या दर्शनासी जाई
ज्ञानी नारायणा उठी वा बोधामृत देई ॥१॥

शिणले दयाळा सद्गुरुनाथा, निद्रा गाढ लागली ।
भक्त संकटी पडले म्हणुनी, धाव तेथे घेतली ।
(उंच चाल) सद्गुरुनाथा परम कृपाळा, उठा करा घाई
करुण रवाने तुम्हा बाहते, दर्शन मज देई ॥२॥

क्षमा करावी श्रीगुरुराया, झोप मोड मोडली ।
कृपा सागरा उघडी लोचना, पूर्व दिशा माळली
मतिमंद मी कृष्णा तनया, चरणी शरण आली
अभयकर हा शिरी ठेवूनी, पाती सुखी देई ॥३॥



# श्री गजानन महाराजांचे पद

प्रथम नमन गुरु गजाननाला ।
निशीदिनी तारी भक्तजनांना ।
चरणी दृढ विश्वास धरा ।।ध्रु।।

प्रथमारंभी शेगांवाला, ज्ञानदेव जणूं भूवरी आला ।
धर्म रक्षण्या घे अवतारा ........ ।।१।।

गुरुकृपे हा योगीराणा, रामदास रुप दावी द्विजाला
दासनवमीचा हेतु पुरविला ........ ।।२।।

आकोट नगरी नरसिंगजीला, गंगा स्फुरिता दाविली जिला
विस्मित केले जनसमुदाया ........ ।।३।।

रुप दाविले भक्त बापूला, गर्वरहित केले कितीकांना ।
शुद्ध भक्तीचा मार्ग कळविला ........ ।।४।।

मतीमंद श्री कृष्णातनया, कृपा असावी सद्गुरु रामा ।
प्रीती द्यावी हरिगुण गाया ........ ।।५।।

# शारदा स्तवन

स्फूर्तिदेवी ब्रम्हकुमारी नमन शारदा ॥धृ॥

सुरवर मुनि करीती स्तवन, देई अम्हा अभयदान ।
नमन तव पदा देवी, नमन तव पदा ॥१॥

पीतवसन परिधरी, कंचुकी वरी साजिरी ।
वीणा असे वामकरी, बुद्धि देवता ॥२॥

कनक मुकुट विराजीत, कर्णी कुंडले दिसे छान ।
कृष्णातनया गात गान, सौख्य दे सदा ॥३॥



(४)

# श्री नरसिंग महाराजांचे पद

(चाल — मैं नहीं भटकनेवाला हूं.)

श्री नरसिंगजीला चाक या, सत्संग समागम पाहू या ॥धृ.॥

तो विठ्ठल हृदयी रमलासे ।
भक्तांचे आगमन इच्छितसे ॥
बालिश क्रीडा करणीया ।
मनकामी झाली पूरती या ॥१॥

मृत जननीला उठविले ।
यमपाश मृत्यूला तुटविले ॥
समर्पिले कृपेशी स्वेच्छेला ।
पेढे घाली जीवाच्या मुखकमला ॥२॥

केली आशा शारदाबाईला ।
अक्षय हरिपदी वसण्याला ॥
अनुग्रहीले त्या धेनूला ।
सन्मार्गी लाविले जनतेला ॥३॥

सदा वेष बावळा शोभतसे ।
रामकृष्ण भजनी ध्यास असे ॥
आकोटला प्रगटले नरसिंग बुवा ।
दत्तचरणी नमी कृष्णाबाळा ॥४॥

# केशवराज (पद १ ले)

केशवाची श्याममूर्ति, आज नयनी पाहिली ।
त्याहळीलि पदकमली, पद्मा जिथे बैसली ॥ध्रु॥

जरीकांठी पितांबर, उत्तरीय साजावर ।
गळा रुळे पुष्पहार, वैजयंती शोभली ॥१॥

शंखचक्र गदाधारी, अभय देत सव्यकरी ।
अंगी उटी केशरी, स्मित हास्य पाहिली ॥२॥

भाळी तिलक कस्तुरी ।
मकर कुंडले श्रवणीं ॥
कनक मुकुट शोभे शिरी ।
प्रिय तुळस मंजिरी ॥३॥

सगुण मूर्ति गोजिरी ।
राहो हृदय मंदिरी ॥
कृष्णा तनया हेच मागे ।
गोड नाम वैखरी ॥४॥

# श्री केशवराज (पद २ रे)

अजि भावभक्तीने जाऊ, पाहू केशवराजाला ॥धृ॥

मूर्ति सावळी लक्ष्मी जवळी, चरणीं स्थिर झाली ।
शंख चक्र करी गदा शोभली, अभय देई भक्ताला ॥१॥

आकोट नगरी श्री संतांची, कर्मभूमि झाली ।
ज्ञानेश्वरीच्या अमृतबोला, जयनाद घुमघुमला ॥२॥

गुणानुवादे नित्य मंदीरी, प्रभुभक्ति होती ।
काल्यासाठी झाली दाटी, यात्रा आषाढीला ॥३॥

अगाध्य लीला या राजाची, वर्णन करवेना ।
माहेर घर जणू सत्संताचे, लाभ बहू झाला ॥४॥

भवसागर हा तरण्या नौका, स्मरा श्री केशवराजा ।
दीनदयाळा भक्तवत्सला, उद्धरी कृष्णबाळा ॥५॥

# विठूराणा

पंढरीचा विठूराणा नयनीं पाहिला ।
समचरण विटेवरी उभा राहिला ।
पाहून कधी श्रीरंगा ध्यास लागला ।।धृ।।

पीतवसन यज्ञोपवित कर कटी असे ।
कौस्तुभमणी शोभे गळा तेज आगळे ।
हास्यवदन पाहुनीया मोह जाहला ।।१।। पंढरीचा.

कैवारी भक्तांचा कीर्ति ऐकीली ।
उद्धरीले किती कांना भीवरेतिरी ।
कान्होपात्रा मुक्त झाली वृक्ष साक्षीला ।।२।।

आवड बहु बुक्क्याची तुळशीफुलांची ।
वैजयंती माळ गळा उटी केशरी ।
कस्तुरीचा भव्य तिलक भाळी शोभला ।।३।।

विठूराया मायबापा सद्गुरु हरि ।
नित्य नाम गोड राहो माझे वैखरी ।
कृष्ण तनया हेचि मागे पुरवी इच्छेला ।।४।।

पंढरीचा विठूराणा नयनी पाहिला ।

# श्री नारायण गुरुंचा अभंग

पाहू पांडुरंगा, भेटू श्री गुरुला
सर्व जाऊ त्यांच्या, पंढरीला ॥१॥

नारायण गुरु, जाती पंढरपुरी । समुदाय थोर, बरोबरी ॥२॥

टाळ मृदुंगाचा नाद बहु गोड, नमले भाविक, माउलीला ॥३॥

जगद्गुरुमूर्ति, बैसे पालखीत, पूजा करीती जन, गावोगावी ॥४॥

मार्ग चालण्याचा शिण नसे काही । क्षुधा तृष्णा जाई, विसरोनी ॥५॥

ऐसा हा आनंद पंढरी वाटेचा । विठ्ठल नामाचा, जयघोष ॥६॥

चंद्रभागे तटी वैष्णवांची दाटी, उभा जगजेठी, विटेवरी ॥७॥

वसंत मातेची पुरवावी आळी, भेट त्वरे द्यावी, मायबापा ॥८॥

# दृष्ट

कृष्ण माझे बाळ तान्हा, श्याम माझा बाळ तान्हा ।
दृष्टावला हा मदनमोहन, उघडीना हा अजून नयन ।।ध्रु।।

उतरा कोणी सखे साजणी ।
म्हणे यशोदाई जननी ।
सकल गौळणी मिळूनी ।
काढी दृष्ट नानापरी ।।१।।

किती शिकवू तुजसी हरि ।
जाऊ नको बाहेरी ।
कोणी तुजसी दाखविली ।
बागुलबुवा आला दारी ।।२।।

तरी मी आळस नाही केला ।
धाऊनी हृदयी आलिंगिला ।
कर्ण फुंकूनी वेळोवेळा ।
घेऊनी अंकावरी ।।३।।

अंबे माते पूजीन तुजसी ।
बरा होऊ दे हृषिकेशी ।
राधा करी अंगारेला ।
कृष्णा तनया नमी त्याला ।।४।।

# मुरली

(चाल – ठुमक चलत रामचंद्र)

रख दे श्याम बंसी जरा, कहत ब्रजललना ॥धृ॥

कैसी जाऊं जल भरना
राह देखे मनमोहना
चुपके आवे मुस्कुराते
फोडे घडा मोरा ॥१॥

मख्खन दही बेचना
जा रही थी शहर मथुरा ।
मुरली की धुन सुनके
हो गयी मैं बावरीया ॥२॥

रजनी शांत चित्त प्रशांत ।
छोटी राधी गयी मिलन
नाह छूटे पल वहे
भोर निकल आवे ॥३॥

चरणी शरण आयी श्याम
दया करो यदुनंदन
कृष्णा तनया गायी गान
नंदके दुलारे ॥४॥

# मुरली

(चाल – निशी दिनी मनी.)

वाजविली वंशी कान्हा, कैसी येऊ पडली चिंता ॥धृ॥

सासु माझी बहु तापट रे ।
येऊ कैसी सांग हरि रे
थांबले अनंता ॥१॥

तान्हे बाळ मी विसरुनी आले ।
देहभान मज मुळी न राहिले
ऐकुनी मुरलीची सुस्वरता ॥२॥

वाट तुझी मी पाहते मुरारी ।
बुडले रे मी या संसारी ।
त्वरीतची ये नंदबाला ॥३॥

सर्वांसंग प्रभू क्रीडा करसी ।
मजसी विसरला कां हृषिकेशी ।
तळमळ जीव हा होतो आता ॥४॥

नेऊनी धेनू यमुनेतीरी ।
वाजे गोपाळ मधुर बासरी ।
नमन करी कृष्णाबाळा ॥५॥

# मुरली

(चाल – जग हे कळशावरचे पाणी)

मोहन वाजवी मुरलीला,
आतुर झाले ऐकण्याला ॥धृ.॥

कात्यायनी हे व्रत गोपींचे
सकल येती स्नानाला ।
कदंबावरी बसुनी हरि तू
लपविले वस्त्राला ॥१॥

माझे माझे वस्त्र दे म्हणूनी,
गोपी तुज विनविती ।
देतो तुमचे वस्त्र तुम्हाला,
आधी नमन करा त्या रविला ॥२॥

गौळणीच्या घरी जाऊनी हरि तूं,
दही दूध नवनीत खासी ।
राधेच्या सदनासी जाऊनी,
करीसी बालक्रीडा या ॥३॥

षण्मासाची रजनी करोनी,
इच्छा नसे मम पुरली ।
एकदा प्रभू वाजवी मुरली ।
वदरी कृष्णबाळा ॥४॥

# नवनीत–साखर

श्यामसुंदरा ये ये श्रीधरा,
नवनीत साखर आवडीची ।

शुद्ध चांदीची वाटी भरली,
आणियली त्या वेळची ॥धृ॥

शुद्ध सत्त्वगुणी साय काढीली, रजोगुणाचे मधुर दही ।
अहंभाव तम मथूनी केले, मृदु नवनीत आले वरी ॥१॥

कमल लोचना हास्यवदना, ये मनमोहना श्रीहरी ।
मम करें तूं नवनीत घेई, प्रेमळ भवित अंतरीची ॥२॥

प्रभातकाळी उठी वनमाळी, घे करकमळी बासरी ।
राधा गौळण द्वारी उभी रे, गोपबाळ तुज पाहती ॥३॥

हट्ट नको करुं उठ माधवा, विनविते मी परोपरी ।
अल्पमति मी कृष्णातनया, मनिषा पुरवीं अंतरीची ॥४॥



# आरती

**श्री नारायण गुरु महाराज**

आरती नारायण गुरुची, सद्गुरु स्वामी समर्थांची ॥धृ॥

पूर्ण अवतार रामप्रभूचा, कलियुगी अवतरला साचा ।
पतितजन उद्धरण्याकरिता, हेतु हाच असे मनीचा ।
चाल – जन्मले अयोध्या नगरीत,
प्रगटले विदर्भ प्रांतात,
वय होते अष्टमात ।
माहुली गावी, आले लवलाही, कृपा श्रीशंकर गुरुची ॥१॥

यज्ञ ते याग आरंभीत, द्विजगण हर्षे दुमनी येत ।
कीर्तने हरिनाम घडत, जमले सभामंडपात ।
चाल – दर्शनी झाली बहु दाटी ।
वाटे पंढरी जगजेठी ।
विप्रजन करीती पुष्पवृष्टि ।
भक्तजन बहुत, आनंदभरीत, सुस्वरे गात लीला गुरुची ॥२॥

भाद्रपदमासी अमावस्येला, करीती गुरु पुण्यतिथीला ।
अन्नदान कितीक झाले, प्रसादा थोर लोक आले ॥
चाल – पायी पंढरी करी वारी ।
संगे भाविक नरनारी ॥
टाळ मृदंगाचे गजरी ।
पुरविली आस, गुरुने खास, मोद चित्तास,
करावी कृपा नित्य साची, इच्छा वसंत मालेची ॥३॥

# अष्टक

आले भूवरी श्रीगुरु ज्ञानराशी ।
भक्तीमार्ग दावी सकळा जनासी ।।
साक्षात् ईश्वर ये जगासी ।
नमस्कार माझा गुरुच्या पदासी ।।१।।

अयोध्यापुरी जन्म विप्रकुलाला ।
धन्य केले जननी पित्याला ।।
नारायणे नाम साजे ज्यासी ।
नमस्कार माझा गुरुच्या पदासी ।।२।।

जसे राम गेले महर्षिगृहाला ।
गुरुदर्शना चालले माहुलीला ।।
भीमातटी घेती अनुग्रहासी ।
नमस्कार माझा गुरुच्या पदासी ।।३।।

त्रिभुवनी गाजली कीर्ति थोर ।
द्विजांसवे वेद उच्चारी चार ।।
अपार यज्ञे, द्विज पूजनासी ।
नमस्कार माझा गुरुच्या पदासी ।।४।।

फाल्गुनमासी अमरावतीशी ।
पजुयाग केला जग रक्षण्यासी ।।
आनंदविस्मय वाटे जनासी ।
नमस्कार माझा गुरुच्या पदासी ।।५।।

करारी जैसा अणू भीष्मराज ।
उदार कीर्ति खरा धर्मराज ।।
होताच दर्शन जळे पापराशी ।
नमस्कार माझा गुरुच्या पदासी ।।६।।

पंढरी यात्रा कष्टाची, घडविली पतीसह सौख्याची ।
ऐसे सामर्थ्य सद्गुरुचे, जाणती भावभक्त मनाचे ।।
पंढरी पावन क्षेत्र, दर्शने तृप्त मम नेत्र ।
झाली मम बुद्धि पवित्र,
नीत असो कृपा श्रीगुरुची, हीच मागणी शेवटची ।।७।।

# गोपाळकाला

ये मनमोहन नंदलाला, घेई काला ।
आम्हा जनांसी तोषविण्याला ॥धृ॥

काहृया पोहे एक केले, लिंबाचे लोणचे मिसळीले ।
दही दूध नवनीत खरे आणिले, बनविला काला ॥१॥

कुठे गुंतला खेळायला, केशी बकासुर वध करण्याला ।
पूतना पान्हा प्राशन करण्या, यमलार्जुन उद्धरीला ॥२॥

पेंद्या सुदामा गौळण राधा, नानापरीच्या करुनी क्रीडा ।
माखवान्हाला केला काला, मोहविले सकला ॥३॥

वदनी कवळ दे माय, यशोदा, आनंदवी हा बालमुकुंदा ।
मुरलकना या अर्पिती सुमना, उद्धरी कृष्णाबाळा ॥४॥

# लूट


(चि. चंद्रशेखर जलतारे)

चाल – अब तेरे सिवा.

ये हासत ये लूट लुटी चंद्रशेखरा ।
हलव्याचा साज तुला शोभला खरा ॥धृ॥

कंठी हार मुकुट शिरी शोभला कसा ।
शामवर्ण कृष्णसखा दिसशी राजसा ॥
तीळगुळ घे गोड हास्य करुनी एकदा ।
जमले हे मित्र तुझे, लूट देखण्या ॥१॥

शीघ्र मिळवी विद्याते, कीर्ति वैभवा ।
सुखवोनी आप्तजना, कुलदीपका, खरा कुलदीपका,
खरा कुलदिपका ।
तिळासम मधुर होई ठेवी गोडवा ।
मिनुल्या, मिनुल्या, मिनुल्या एक मधुर–
बोल साजिरा ॥२॥



# लूट – (चि.प्रवीणची)

प्रवीणा, लूट तुझी रे आज, केला हलव्याचा नवसाज ॥धृ॥

आल्या महिला, तुज ओवाळी ।
जमली किती रे बालमंडळी ।
वाटी खाऊ त्यांस ॥१॥


संक्रमणाचा सण मौजेचा
आज घोळला बहु हलव्याचा
होईल दृष्टचि खास ॥२॥

आज तिळापरी सान तू असला
मोठेपणी रे मिळवी कीर्तीला
विद्यावैभव खास ॥३॥

आजोबांचा नातु लाडका
शूर होई रे तू कुलदीपका
सुदृढ हो ही आस ॥४॥

# चि. प्रवीणच्या मौंजेप्रित्यर्थ

आशिर्वाद वचा बटू स्वरीत घे, आयास पितामह ।
पित्याचे जमलेत उत्सव ग्रह हे, उत्सुक सर्वांसह ।।
चैत्राचे तिथी शुद्ध पंचमी दिनी, व्रतबंध तो नेमिला ।
पाहोनी शुभचंद्र लाभ बटूला, कुर्यात् सदामंगलम् ।।१।।
मातामही सुनीति, प्रविण ! तुजला, भिक्षा पुढे वाढते ।
घेवोनी हेमपात्री, बटूला, सद्बुद्धि ती अर्पिते ।
स्वीकारी बचि तूं स्वकुलास भूषवी, गोपाळच्या बालका ।
स्वस्ति स्वस्ति वदे अनंत तनया, कुर्यात् सदामंगलम् ।।



# मातृभोजन

(अरुण देशपांडे)

(चाल – अब तेरे सिवा)

या मोदभरे गाऊ चला गान बटूला,
सुवर्ण दिवस पहा आज पातला ।।धृ।।

रंगमाळा नानापरी, समया लाविल्या ।
पक्वान्ने बहुत केली मातृभोजना ।
जननी जवळी पाटावरी बैस राजसा ।।१।। चला या.

मामी चुलती आत तशी मावशी पहा ।
प्रथम जननी चिर देई प्रीति अंतरा ।
खरी प्रीति अंतरा
चल उठ बटू शीघ्र आता काशी जावया ।
अरुणा, अरुणा, अरुणा करिती तुजसी द्विज पाईला ।।२।।

## चि. बापूराव व बाबा यांच्या
## शुभ विवाह प्रसंगी केलेले

कार्याच्या शुभ मंडपी मुदभरे यावे त्वरे मोरया ।
आशिर्वाद वधूवरास बरवा, वर्षोनिया अक्षदा ॥
उभयांचे बहु आप्तमित्र जमले, कार्यास या मंगल ।
वदती सर्व सुहास्य वदने, होवो सदा मंगल ॥१॥

येई जीवनी 'ऋतुराज' हा बघुनिया 'सुहास' आनंदली ।
वरमाला करी घेऊनी उभी असे, उत्सुक ती अंतरी ॥
प्रीतीने तिज मान दे झडकरी, पत्नीपदाचा खरा ।
लाभो सौख्य तुम्हा वधूवरा, कुर्यात् सदा मंगलम् ॥२॥

लोकी जीवितमार्ग साधितसे, जो हा गृहस्थाश्रम ।
प्रेमाचा फुलबाग त्यांत फुलवूनी, कर्तव्या व्हावे रत ॥
प्रीतीचा मृदुबंध तोल धरुनी, टाका पुढे पाऊल ।
वाढो वैभव कीर्ति लोकी पसरो, कुर्यात् सदा मंगलम् ॥३॥

रामाला जशी जानकी शोभविते, कृष्णास ती रुक्मिणी ।
चंद्राला जशी रोहिणी प्रिय, तशी सुमन अनंता प्रति ॥
संसारी तुमचा परस्परा नी इतरा, भावे स्मरोनी ईशा ।
आशिषासह सर्वही वदती हे, कुर्यात् सदा मंगलम् ॥४॥

(२३)

## चि. सुरेश व चि. मंगला

२१।१२।७०

विघ्नेशा शिवगौरी संभूतनया, आधी तुला प्रार्थिते ।
ऋद्धि सिद्धी सहित या सकल ही, पाचारिले आदरे ॥
वीणादेवी सरस्वती भगवती, वेदर्षीची देवता ।
कुलश्री जगदंबिके त्वरीत ये, कुर्यात् सदा मंगलम् ॥१॥

लाभो सौख्य सदैव या वधूवरा, आशिर्वचा ही असे ।
सुरेशास खुले सुमंगल वधू, जणू लक्ष्मी भासते ॥
प्रेमाची वरमालिका मृदुकरी, उत्सुकली अंतरी ।
स्वीकारी शुभ विप्र हेचि वदले, कुर्यात् सदा मंगलम् ॥२॥

आहे प्रेमळ सासू आणि श्वशूर, बाळे तुम्ही सत्य की ।
सान्निध्यात रहा तुम्ही उभयता, आदर्श ठेवा मनी ॥
संसारी सुखी व्हा सुकीर्ति मिळवा, चित्ती ईशा स्मरा ।
नांदा सौख्यभरे तुम्ही उभयता, कुर्यात् सदा मंगलम् ॥३॥

# चि. प्रमोद व विजय देशपांडे

१२।७२

यावे हो गणनायका शिवसुता, पाचारिते आदरे ।
वीणादेवी सरस्वती भगवती, वेदमाची अंबिके ।।
याव्या सर्व मिळोनी सुरललना, या मंडपी सत्वरे ।
द्यावी मंगल अक्षता वधूवरा, कुर्यात्. ।।१।।

वाजे मंजुळ ही सुरेल सनई, लावियले तोरण ।
गाती मंगल गीतिका मधुर ही, व्हावे सदा मंगल ।।
उभयांचे जमलेत आप्तजन हे, कार्यास या मंगल ।
वदती सर्व पहा सुहास्य वदने, कुर्यात्. ।।२।।

संसारी करुनी प्रवास सह तो, गांठा तुम्ही ते स्थळ ।
जेथे वैभव कीर्ति आणि सुनीति, यांचा असे संगम ।।
अंतराल मनी जपा मुखी सदा, सत्यं शिवं सुंदरम् ।
सन्मार्गी तुम्हां चाल हा आशिष हो, कुर्यात्. ।।३।।


झालासे मनीहि प्रमोद अमुच्या लाभे आम्हा विजय तो ।
जयमाला करी घेऊनी उभी असे भाग्यश्री ही आज हो ।।
फुलवा हा फुलबाग तो बहरु द्या, कर्तृत्व ते दावून ।
भाग्याचे नवरंग ते उधळू द्या, कुर्यात्. ।।४।।

आता सावध होऊनी वधूवरा, संसार सौख्ये करा ।
धर्माला विसरा न पूज्य अपुल्या, ते सर्व ध्यानी धरा ।।
वडीलांचे मत पाळुनी सुखी करा, शांति विवेका धरा ।
नांदा सौख्यभरे तुम्ही उभयता । कुर्यात्. ।।५।।

# चि. चंद्रशेखर जलतारेच्या विवाह प्रसंगी

सोन्याच्या शुभपावली ममगृही, आली स्नुषा आजगे ।
विष्णूची ललना क्षीराब्धी तनया, सुनिती तशी भासू दे ।।
घेवोनी वरमाळ ही वधी करी, पूजियली अंबिका ।
अर्पोनी (मनी) चंद्रशेखरास सुमने, कुर्यात् सदा मंगलम् ।।१।।

आली स्वगृही आज या शुभदिनी, सुलक्षणी सुनिता ।
श्रीविष्णुसम चंद्रशेखर गमे, तू शोभली कमलजा ।।
सत्कार्यी रत राहुनी उभयता, साधा मनी एकता ।
कर्तव्ये पथ चालता श्री मिळते, कुर्यात् सदा मंगलम् ।।२।।



# चि. पद्मजा व शामकांत तारे

स्वस्ति श्री गणनायका अविघ्नम्, कार्यास ये शारदा ।
विद्यादेवी सरस्वती कुललक्ष्मी, वैदर्भीची देवता ।।
आणि सद्गुरु माहुलीकर इथे आशिर्वचा द्यावया ।
वर्षा मंगल अक्षता वधूवरा, कुर्यात् ।।१।।

झाले धन्य अनंत आणि सुनिता, भाग्यास वानू किती ।
सद्गुणी शामात शाम हा असे पद्मा तया अर्पिली ।।
स्वीकारी तिजला आजच्या शुभघडी, संसारी व्हावे सुखी ।
हर्षाने वदले स्वकीय जन हे, कुर्यात् ।।२।।

सूर्याच्या किरणे प्रभा उजळली, आनंद पृथ्वीवरी ।
चंद्राच्या उदये खुले कुमुदिनी, मोदे डुले माधुरी ।।
तैसे मीलन शाम आणि पद्म हे, सरिता मिळे सागरी ।
कीर्तीचा फुलबाग हा बहरु द्या, कुर्यात् ।।३।।

आम्ही आजवरी जपोनी दुहिता, आता तुम्हा अर्पिली ।
दोघांचे मनध्येय एक असू द्या, व्हाया सुखी जीवनी ।।
ठेवा शांति मनी विवेक अपुल्या, चित्ती ईशा त्या स्मरा ।
नांदा सौख्यभरे तुम्ही उभयता, कुर्यात् ।।४।।

# चि. शैलजा व डॉ. सुनिल लुले

१६।११।८४

स्वस्ति श्री गणनायका अधिनमू, ये पार्वती नंदना ।
स्फूर्तिदेवी मयूरावरी बसुनी ये, करीते पदी वंदना ॥
येई गे कुलस्वामिनी प्रियसखी, वैदर्भीची रेणुका ।
आले सद्गुरु माहूलीकर इथे, कुर्यात् ॥१॥

कृष्णाला जशी रुक्मिणी प्रिय तशी, चंद्रास ती रोहिणी ।
सूर्याच्या किरणे फुले वसुंधरा, आनंद वर्णू किती ॥
झाले मीलन आजच्या शुभदिनी, सरिता मिळे सागरी ।
आशिर्वाद असा पितामह वदे, कुर्यात्. ॥२॥

झाले धन्य पिता आणि जननी गे, समृद्धि पाहुनी ।
त्याही सूज्ञ आणि विवेकी असती, भाग्यास वर्णू किती ॥
ताई 'मंगल' हे वदे सहर्षे, स्नुषा जणू लक्ष्मी ।
सान्निध्यात सुखे रहा मम गृही ॥ कुर्यात् ॥३॥

जाते स्वगृही शैलजा पतिसवे, हर्षित उल्हासुनी ।
कन्यादान वसंतराव करितो, सुनीलास ती अर्पुनी ॥
स्वीकारी मम सद्गुणी ही दुहिता, आशिर्वचा देऊनी ।
झाली सद्गद ही सुहास जननी, कुर्यात्. ॥४॥

आहे प्रेमळ सासू आणि श्वशूर, दैवे तुला लाभली ।
सद्गुणी वर हा सुनील तुजला, शोभे जणू श्रीहरि ॥
दोघांचे मन ध्येय एक असू द्या, लुले कुला भूषवी ।
होई सुगृहिणी पितामही वदे, कुर्यात्. ॥५॥

# चि. प्रविण व चि. माया (प्रज्ञा)

१२।१२।८८

ये प्रवीणा तुजला अजि मिळलसे, समृद्धिची इंदिरा ।
स्वीकारी गुणी रत्न हे लडकरी, जोडा दिसे साजिरा ।।
आशिर्वाद असा पितामह वदे, वर्षोनिया अक्षता ।
झाली हर्षित ती पितामही म्हणे, कुर्यात्. ।।१।।

भाग्याचे असती अनंत आणि सुनिता, स्नूषा तुम्हा लाभली ।।
आली ही कमलाक्षी भाभी माया, शुभ भालीला घेवोनी ।।
प्रमाची शुचि माळ घे मृदुकरी, अर्पी प्रवीणास या ।
व्हावे सावध हे स्वकीय वदले, कुर्यात्. ।।२।।

आता सावध होऊनी वधूवरा, संसार सौख्ये करा ।
धर्माला विसरा न पूज्य अपुल्या, ते सर्व ध्यानी धरा ।।
वडीलांचे व्रत पाळूनी सुखी रहा, आदर्श ठेवा मनी ।
लाभो कीर्ति अशी वधूवरा, कुर्यात्. ।।३।।

लोकी जीवितसार साधित असे, जो हा गृहस्थाश्रम ।
प्रमाचा फुलबाग त्यात फुलवूनी कर्तव्यी व्हावे रत ।।
प्रीतीचा मधुबंध तोल धरुनी, टाका पुढे पाऊल ।
वाढो वैभव कीर्ति लोकी पसरो, कुर्यात् ।।४।।

# चि. स्मिता व मिलिंद पुराणकर

आधी वंदन श्रीगणेशदेवा पाचारिले आदरे ।
ऋद्धि सिद्धी सहित या लडकरी, माहुरची रेणुके ॥
आले श्रीगुरु दत्तराज प्रभूजी, आशिर्वचा द्यावया ।
व्हावे सावध वऱ्हवृंद वदले कुर्यात् ॥१॥

आता सावध होऊनी उभयता, संसारी व्हावे सुखी ।
वदले हे जणू व्यंकटेशगिरीचे घेऊनीया लक्ष्मी ॥
घेऊनी वरमाळा ही स्मितमुखी, अर्पी मिलिंदास या ।
झाली सद्गद ही कुमुद जननी, कुर्यात् ॥२॥


सरिता नी यशवंत धन्य झाले, जामात हा सद्गुणी ।
अर्पिली दुहिता मिलिंद तुजला, स्वीकारी अर्धांगिनी ॥
झाले मीलन आजच्या शुभदिनी, सिंधू मिळे सागरी ।
हर्षाने वदलेत आप्तजन हे, कुर्यात् ॥३॥

माधुरीसह सुधाकर पहा, प्रेमे तुला वागवी ।
मायेच्या ममती सदैव तुजला, कन्या जशी मानली ॥
पुरविले किती बालकौतुक तुझे, झाल्या अशा आठवणी ।
होशी सुगृहिणी सुशील सदनी, कुर्यात् ॥४॥

भाग्याचे किती सासु आणि श्वशुर, बाळे तुझे साथ की ।
सान्निध्यांत रहा विवेक धरूनी, दैवे तुला लाभली ॥
राही नम्र सदा तुला कथितसे, मातामही हर्षुनी ।
समृद्धीत रहा तुम्ही वधुवरा, कुर्यात् ॥५॥

# आजोबांचे आशिर्वाद

माझी नात ही शील असे मृदुभाषिणी शालिनी ।
दिधली आज मिलिंद तुजला, सहचारिणी सद्गुणी ॥
आशिर्वाद असा हे मातामह म्हणे हर्षे मंडपी गर्जूनी ॥
राहो आनंद सदैव हा वधुवरा संसारी व्हावे सुखी ॥१॥



# विहीण

(सौ. सुहास व सौ. सुनीता)

(चाल – मनोरथा चल त्या नगरीला.)

करुं नका किमपि चिंतेला, सांगणे खरे अजि तुम्हाला ॥ध्रु॥

सुशील सद्गुणी बाला तुमची,
झाली स्नुषा आज आमुची,
गृहलक्ष्मी ही मम सदनाला,
प्रेमे करुं आम्ही बहु जतनाला ॥१॥

सर्व सुखाची होईल बाला,
खात्री असू द्या विश्वासाला,
अनुभव येईल त्वरितची आता,
कन्येसम परी मानू हिजला ॥२॥



# विहीण

(चाल – कल्पवृक्ष कन्येसाठी.)

अल्प बोल कन्येसाठी ऐकूनी घ्या विहीणीबाई
सूज्ञ आपण असता माझे, सांगणेचि न लगे काही ।।धृ।।

हर्ष झाला वर पाहोनी
हिरा सुंदर हा शोधूनी,
सांभाळा ही प्रेमे हिजला
स्वाधीन ही तुमच्या केली ।
कन्यारत्न आम्ही अर्पिले, थोरपण आपणा आले
वाढविली जीवापाड, पंचप्राण माझे तीत ........।।१।।

क्षमा करा अपराधाला,
मायेची वरी पाखर घाला,
नूतन स्नुषा समजूनी बाला,
हृदयीचा हा ठेवा दिधला,
सुखी व्हावी तू संसारी, वाटतसे सर्व मातेला,
यश राही गृहकार्यासि, वाढवी तू कुल कीर्तीला ।।२।।



# विहीण

सौ. सुनंदा

चाल – मज आणून द्या हो

करू नका काळजी, सत्य वदे वचनाला ।
प्रेमाने वागवीन कन्येसम ही बाला ॥धृ॥

ही लक्ष्मी आली गोकुळसम सदनात,
ही स्नुषा आमुची राहील आनंदात,
सद्गुणी जाणुनी पारखले रत्नाला,
ही खुषीत राहील अमुच्या सान्निध्याला ॥ प्रेमाने ॥१॥

गृही दक्ष असावे हेच नारी भूषण,
पुरवील मनिषा, सुखसमृद्धी छान,
श्रीहरी पुरवी आस अशा समयाला ॥ प्रेमाने ॥२॥

राहीले मान जरी
आम्ही मनीं धरीलो मुळी नच काही,
सांगणे आपितची ठेवा विश्वासाला ॥२॥

# विहीण

(सौ. प्रमोद)

(चाल – चषक दुधाची.)

विहीणबाई विनंती तुम्हाला, सांभाळा बाळाऽऽ ।
अनुसरणीया अगरहाटीला, दिधली तुम्हाला ।।धृ।।

बालपणी सौख्यात वाढली,
वडीलांची जणु लाडीत बनली
भावंडांची लाडकी झाली, गोतावळी बाळा
वात्सल्याचे चकीत व्याही, पुरवा हौसेला ।।१।।

कन्यारत्न हे धन परक्याचे ।
विदीत असोनी अल्प बोलीते ।।
हृदयीचा ठेवाऽऽ सुज्ञ मनाच्या विहीणबाई ।
दिला पोटचा गोळा ।।२।।

प्रमोदिनीचे भाग्य उजळले
विजयराव हे रत्न गवसले ।
थोर मनाचे श्वशूर लाभले,
गोकुळसम सदनाला,
भाग्यलक्ष्मी लाभो तुम्हाला, विनवी ईशाला ।।३।।

# डोहाळे

## (सौ. सुहास व सौ. सुनीता)

(चाल – वृंदावनका कृष्ण कन्हैया)

इच्छा मनीची सांग त्वरे ग, पुसते सासु सुनेला ।
संशय चित्ती मुळी न धरावा, पुरवीन मी तव डोहाळ्यांना ।।धृ।।

पहिले मासी काही सुचेना, तगमग अंतरी होत असे ।
दुसरे मासी विचार शिणविती, तिसऱ्यामध्ये तेज चढे ।।
चवथा महिना संपताच मग, आनंदीत ही दिसली बाला ।।१।।

पाचवे मासी चोरचोळीची तयारी केली होसेने ।
नानापरीच्या खिरी पक्वान्नं, काय आवडे या मनाते,
लाजून सखी ती हळूच वदली, पुरवा माझ्या डोहाळ्यांना ।।२।।

सहावे मासी जावे फिराया, पति सवे मी बागेमध्ये ।
पुष्पलतांचे करु हिंदोळे, चंद्रविहारा जाऊ गडे ।।
मास सातवा, उधळूनी गहुला, विनोद करीती नणंद जावा ।।३।।

आठवे मासी सुमुहूर्त पाहूनी पाठविली सखी माहेरा ।
प्रेमळ श्वशुर आशिष देती, सगुण पुत्र होईल तुला ।।
नववे मासी बाळ जन्मले, आदर्श माता भावी पिढीला ।।४।।

(३५)

# डोहाळे

(सौ. सिंधू पंचभाई)

(चाल – लिंबलोण उतरता अशी का)

काय होतसे सांग साजणी, डोहाळे कोणते
विचारी प्रभाकर सिंधूप्रति ॥धृ॥

वदन कशाने म्लान जाहले,
विचार चित्ती कसले आले,
सोन्यासम तू दिसते पिवळी,
गर्भाची ती छाया पडली,
लाजू नको प्रिय सखी ॥१॥

बागबगीचा जाऊ फिराया,
नूतन सुंदर पिक्चर आला,
नौका विहार आवडे तुजला,
चंद्र प्रकाशित रिझवित मनाला,
गर्भवती शोभली ॥२॥

एक इच्छा मम होती ऐसी,
आदर्श माता व्हावे मी जगी,
नवसे माझे बाळ जन्मला
उभय कुळाला मोद जाहला,
स्पृहा पुरी होतसे ॥३॥

(३६)

# डोहाळे

(सौ. कुमुद भीडे)

(चाल – नगरी नगरी, द्वारे द्वारे)

नवगर्भिणी तुज काय आवडे, शुभ लक्षणी तू सांग ना ।
आनंदाने पुरवीन बाळे, निशंक मनी बोलना ॥धृ॥

शुभ्र चांदणे माल शशीचे, धवल पुष्प ते जाईचे ।
हिरवी साडी नेसुन बाळे, आवडीने करी भोजना ॥
सुवासिनी आनंदे आल्या, मधुर गाती त्या गायना ॥१॥

नकोत नवपक्वान्ने मजला, नको तो फालू तो शेला ।
उज्ज्वल चारित्र्याची कीर्ति, जणू शिवाजी देशाला ॥
हिंद बंधूचे साह्य घेऊनी, निर्दाळीन मी शत्रूला ॥२॥

वीरमाता व्हावे जगती, देशकार्य घ्यावे हाती ।
हीच मनीषा झाली चित्ती, श्रीहरी पुरवी कामना ॥
निशीदिनी विनंती करीते देवा, उदरी यावे या क्षणा ॥३॥

भाग्यवतीचे ऐकूनी बोला, विस्मय वाटे मातेला ।
पुरवील मनीषा बाळे तुझी ग, आशिर्वाद हा मम ऐसा ॥
ईश्वर चरणी चित्त ठेवूनी, अंबेशी करी प्रार्थना ॥४॥

# डोहाळे

(श्री. प्रमोद देशपांडे)

(चाल – आजि हौस जिवीची पुरवा)

डोहाळे नवगर्भिणीचे, वद सखे काय होती ते ॥धृ॥

तू पूर्ण विवेकी असशी, वद काय योजिले चित्ती ।
शील शांत वदन पाहोनी, होई मोद अंतःकरणी ॥
तू गर्भिणी म्हणूनी तुजला
डोहाळा मनीचा पुसीला
शुभसत्य प्रश्न मी केला
मी पुरवीन तव इच्छेते, वद काय होती जे ॥१॥

प्रियकरा प्रश्न ऐकोनी, राहीना गुपीत हृदयाते ।
वाटते तुझी मूर्ति नयनी, पूजावी निशिदिनी ध्यानी ॥
तव मूर्त रूप घेवोनी
जगी यावे बालकानी
वीरांचा आदर्श ठेवोनी
मिळवावी कीर्ति जगताते, वद काय होवो जे ॥२॥

सुभद्रेच्या ऐकूनी वचना, विस्मयता होई सख्याला ।
तू वीरप्रसवा होशी, नच शंका उरली चित्ती ॥
सदृढ होई बाल
मम इच्छा ती पुरवील
हे मानी सत्य मम बोल
राही तू शांत चित्ताते, वद सखे काय होती जे ॥३॥


# पाळणा

(चि. प्रवीण बल्लारे)

बाळा जो जो रे, निल कमला, लागू दे तव डोळा । जो रे
नूतन पाळणा बनविला,
सुंदर चिमण्या त्याला
बघूनी हास्य करी, खेळूनीया,
नीज स्वरे छकुल्या या, बाळा जो जो रे ॥१॥

या रे फिरूनीया, बहु रमला, नूतन नरदेहाला,
जन्म बाळासी, लक्ष्मीबाळा, लाभली दोन्ही
कुळा या ॥ बाळा जो जो रे ॥२॥

नामकरण विधी आज झाला,
पाहूनी मुहूर्ताला, कुमार प्रवीण रे
नामियला, गाते कृष्णा तनया, बाळा जो जो रे ॥३॥



# पाळणा

(चि. शैलजाचा)

(चाल - धीरे से आजा री अखियन मे)

नीज नीज छकुले ग तू लडिवाळे, नूतन तनु धारिणी झोप बाळे ॥धृ॥

आऽऽ, नूतन रंगीत सजवूनी झूला, सुंदर चिमण्या
बहु त्यांशी खुळख्या ।
अंगाई गाते मावशी आत्या, दमलीस बाळे घेई विसावा ॥१॥

नामविधीचा बहु थाट करुनी, शैलजादेवी तुज नामियली ।
सुखवोनी अपुल्या मातापित्यांशी, भूषण होई दोन्ही कुलांशी ॥२॥

नीज स्वरे ग गुणी लडीवाळे, भाग्याची मोठी अंगणी खेळे ।
सुदृढ राहोनी करी बाळलिला, आजोबा आजीच्या
सौख्याचा ठेवा ॥३॥

नीज नीज छकुले ग तू लडिवाळे, नूतन तनुधारिणी
झोप बाळे ॥४॥

# पाळणा

(चि. सुधीर पंचभाई)

(चाल – दर्शन दो घनश्याम )

सो जा रे नवजात बाल अब, तरसे नयना रे ।
छवी ये कोमल देखत सुंदर, दिल भर आते रे ।।ध्रु।।

श्रावण दिलमे आगमित पारद
चंद्रशेखर पिता प्रमुदीत
सिंधुबाला झूला झुलावे
मानो झूले हमारे ।।१।।

भोर ये निकली, सूरज आया ।
इसी अगनने तुमको पाया
भाग्यसूर्य अब एकहि मेरा
दिलको हर्ष दिलाये ।।२।।

बचपनमे अब खेल कूदना ।
नंद दुलारे सम तुम पढना ।।
कर्म पथपर हरदम रहना ।
भाग्य भूषण मेरे ।।३।।



# पाळणा

(चि. सुनील भीडम)

जो जो नीज बाळा, हसतमुखा, लागू दे तव डोळा ॥ध्रु॥

सुप्रभातीची वेळा, सुखविण्या, मंगलमय समयाला ।
जन्मा आलासी, हर्षविण्या, यशवन्ताच्या बाळा ॥१॥

निद्रा बाळाची, सौख्याची, थांबविलेल्या तनूची ।
गाते अंगाई, तुज आता, न करी कसली चिंता ॥२॥

देश असे अपुला, सधनांचा, सद्गुणी सुसंस्कृतीचा ।
आदर्श ठेवोनी, वीरांचा, दीपक तू मम गृहीचा ॥३॥

भूषण स्वकुलाचे, भीडमाचे, वाढवी यश कीर्तीते ।
आजा आजीच्या, बोलाला, राहो साचिल्याला ॥४॥



# पाळणा

(चि. माधुरी पंचभाई)

तूं अमलीस गे, सान सोनुली बाळे, विश्रांति घेई वेल्हाळे ।।ध्रु।।

शुभकार्याशी जमले आप्तजन, बाळे, नवकलिके आगमन केले ।
तवं हास्यवदन पाहोनी ।
होई मोद अंतःकरणी ।
पहुडली सुलोचन बाळी ।
नच उरली गे चिंता तुज लडिवाळे, विश्रांति घेई वेल्हाळे ।।१।।

तुज रिझवाया झुंबर सुबक झुल्याला कुतूहल बाळ जीवनाला ।
मुठी मधरी धरी, पायी वाजतो वाळा आनंदीत होई बाळा ।।
नामविधी बहु थाटाचा ।
मधुराणी सुमंगलतेचा ।
दे आशिष वडील जनांचा ।
तंव जननी गे, गाई गोड अंगाई, करी बाळे जो जो गाई ।।२।।

(४६)

# पाळणा

(चि. जयंत कल्तारे)

जो जो करी बाळा, कुलदिपका, नूतन तनुधारका ।।ध्रु।।

आगमन बाळाचे, चैत्राशी, हरिदिनी प्रथमा रात्री ।
जन्मा आलासी, सुखवणी, हर्षविले सकलासी ।।१।।

पहुडनी पाळण्यां, नवकमला, ऋतुराजाच्या बाळा ।
सद्गुण मिळवी या, कीर्तीला, भूषण भावी पिढीला ।।२।।

आशिर्वच द्यावा, पितामह, शतायु सुदृढ होवा ।
पुरवी ही मनीषा, जगदीशा, येई संकटनाशा ।।३।।

हिंदुदेश अपुला, बहु श्रमला, दुष्टाने गांजिला ।
पावन करी त्याते, पावसा रे, सुहासिनी पुत्रा रे ।।४।।



(४४)

# पाळणा

(चि. अमर जलतारे)

३-११-७१

मी हलविते झुला तुज नवकमला, सुंदरा नीज सोनुल्या ।।ध्रु।।

दिन चतुर्दशी उष:काल समयाला, बिल्वतुलसी वाहती ललना
साहित्य करी घेवोनी या पूजेचे, सुस्वागत करण्या रवि.चे ।
चाल – अमृतसिद्धी योगाला ।
हरिहर मीलन समयाला ।
नव बालक जन्मा आला ।
होई हर्ष मना, सकल आप्तजनाला, वाढविसी कुळ किर्तीला ।।१।।

तूं दमलासी, नीज घडीभर बाळा, न करी वा कसली चिंता ।
तूं वीरची रे, आहे थोर कुलावत, जन्मला भरत देशात ।
चाल – उत्कर्ष करी देशाचा ।
चिमुकला राजा अमुचा ।
थोर पुरुष होई साचा ।
मी गाते रे अंगाई लडिवाळा, अमरनाथ तुज नामियला ।।२।।

# पाळणा

(चि. कौस्तुभ उर्फ आनंद देशपांडे)

१८-११-७२

नीज नीज सोनुकल्या, गुणीबाळा, गाते अंगाईला,
जो जो जो जो रे ||ध्रु||

बाळा किरणीया, चमकारी, आला अमुच्या वंशी ।
सार्थक करी ऐसे, नावाचे भूषवी उभय कुलाते ॥१॥

दिन हा कार्तिकीच्या, व्दादशीला, युवराजा अवतरला ।
मातामही गाते, हरिलीला, असता गोपाळकाला ॥२॥

गोष्टी वीरांच्या, पितामही, सांगेल न करी घाई ।
आदर्श ठेवोनी, वीरांचा, होई थोर मनाचा ॥३॥

दोन्ही आजोबांची, सत्कीर्ति, वैदर्भी दुमदुमली ।
तैसा होशील का, कुलदीपका, पुरवी माझी मनीषा ॥४॥

विश्रांती घेई, सुकुमारा, विजयाचा तूं हिरा ।
प्रमोद जननीच्या, सोल्पाळा, फुलवी संसाराला ॥५॥

सेवा करी अपुल्या, देशाची, तोषवी भूमातेसी ।
स्वराज्य रक्षाया, प्रभुराया, आला महाराष्ट्रा या ॥६॥

# पाळणा

(चि. व्यंकटेश उर्फ अजिमय जलतारे)

नीज नीज नयनाला, नीज गुणी लडिवाळा, गाते मी अंगाईला ।।ध्रु।।
तिथी सप्तमीच्या शुभ मंगल समयाला
कुलदीपक जन्मा आला, ही भाग्याचा, थोर वैभवतेला
हे मानी सत्य वचनाला
(उंच) — मिळविसी अतुल विद्येला
सुखविसी जनक जननीला
तैसेचि आप्त जनाला
तव पितामही, दृष्ट तुझी रवकरे, कुसुमादि पल्लव उतरे ।।१।।

बहु श्रमलासी, घेई विश्रांतीला, या छान रम्य समयाला ।
सजविला बहु सुंदर सुबक झुल्याला, मृदु गोड सळी गाळाला ।
(उंच) — जमल्या महिला हर्षाने
प्रेमाने गाती गाणे
किती गोड मधूर स्वानी
नामविधीचा थाट आजी बहु केला, श्री व्यंकटेश नामियला ।।२।।



(४७)

# पाळणा

(चि. मुग्धा कलतारे)

निज नीज सोनुकले, नवकलिके, मृदु अंगाई गाते ॥ध्रु॥

धवलीस फिरफिरुनी, सुकुमारी थोर कुळी अवतरली ।
भाग्याची होई, शशी वदने, निद्रा करी मृगनयने ॥१॥

लाडकी सर्वांची, पित्याची, बंधु भगिनी आत्याची ।
मावशी आनंदे, गीत गाते, नीज गुणाची सरिते ॥२॥

नामकरणविधी, मोदाचा, जननीच्या हर्षाचा ।
कुर्डी करीते, पुनिताई, दुष्ट काढी लवलाही ॥३॥



# पाळणा

(चि. बुबुलचा)

जो जो जो रे । सोनुकल्या । शैलाच्या तान्हुल्या ।।धृ।।

नूतन पाळणा सजविला, सुंदर मयूर पिसारा,
राघु वे चिमण्या गाऊनी, कोकिळा मधुर स्वराला ।।१।।

शिणका फिरवीचा हे, छकुल्या भारतात अवतरला,
भाग्याचा होई कुलदीपका, मिटवा नयन कळयांना ।।२।।

दोन्ही कुळांचा लाडका, आजोबा आजीचा,
मातुल मावशी किती होणी निजवा रे गुण राशी ।।३।।

सुनिल तात तुझा हर्षला, पाहून पुत्र रत्नाला,
आत्या आजी काढी, दृष्टीला पाळण्यात झोपविला ।।४।

नामकरण विधी, आज झाला जमवुनी आप्तजनाला,
प्रपितामह देती, आशिषाला, वैभवात नवकमला ।।५।।

# पाळणा

## (चि. अनिरुद्ध जळतारे)

जो जो जो जो रे सोनुल्या, छकुल्या, नीज तान्हुल्या
जो जो जो जो रे ।।धृ।।

आगमन बाळाचे, मार्गशिर्षी, हरिदिनीच्या शुभरात्री ।
जन्मा आलासी, गुणी चंद्रा, घडीभरी करी या निद्रा ।।१।।

नाचविसी, कर मुठीच्या उचविणी, पिता जननी तोषविणी,
बघुनी मधुलीला, मृदुबाला, गोड खळी गालाला ।।२।।

आशिर्वच देती, पितामह, शतायु सद्गुणी होय,
मिळवी कीर्तिचिया दिशेला, भूषण दोन्ही कुळाला ।।३।।

नामकरणविधी, थाटाचा, कुलदीपका, नवशिशुचा,
अनिरुद्धा तुजसी नामियला, पाळण्यात झोपविला ।।४।।

(५०)

# प्रथम रंगपंचमी

(चि. सुधीर पंचभाई)

(चाल – चील सागरी कशास.)

ये सुधीर खेळ रंग, कंचनकी ते जमवूनी ।
पंकजा नी पद्मजा ही वाट पाहती तुझी ॥धृ॥

रंग खेळला मुकुंद, गोकुळात करी आनंद ।
व्रजनारी होती दंग, खेळ त्यापरी जरा ॥१॥

शर्करेची मधुर गोड, कंठी माळ साजिरी ।
लावी वदनी बघुनी तुला, हासती ते सौंगडी ॥२॥

लाभो सौख्य होई थोर, वैभवाते मिळवूनी ।
सप्तरंगी रंगलास, माय सिंधु बोधली ॥३॥



# चि. सुरेश यांस संदेश

## [चीनचे आक्रमण झाले असता]

चाल –

जातोस दूर बाळा, मन चैन ना मनाला ॥ध्रु॥

जननी नी जन्मभूमि, ही सौख्य एक मानी ।
निर्दाळूनी रिपूला, ये परत स्वगृहाला ॥१॥

ध्वज उच्च भारताचा, फडकविरे आर्य पुत्रा ।
संसारीचा हिरा तू, मम जीवीचा विसावा ॥२॥

आशिर्वचा ही अमुची, पाठी सदैव तुझ्या ।
वीरश्री प्रसन्न तुजला, जयदेवी घाली माला ॥३॥

# धांवा

(चाल – राधे कृष्ण बोल मुखसे.)

धांव धांव श्री मुरारी, गांजिली रे तुझी भगिनी ।
धांव धांव तू ।।ध्रु।।

दुर्योधन दुःशासन, कर्ण शकुनि करीती छळण ।।
विटंबिती मज मधुसुदना, यदुराज झडकरी येई ।।
केश धरुनी सभेशी आणिले, पांडवांनी मौन धरीले ।।
भीष्म द्रोण स्तब्ध बसले, अंकी मैस कठीणही बोले ।।
नग्न कराया मजला म्हणती, कुठे गुंतला रे श्रीपती ।।
अंत किती तू माझा पाहसी, कां न ये करुणा तुजला ।।
निद्रीत असतां चक्रपाणी, धावा भगिनीचा पडता श्रवणी ।।
वेगे चाले गरुड त्यजूनी, पाठीशी उभा गिरीधारी ।।
पीत वसन देखूनी नयनी, सकळ सभाजन लागती चरणी ।।
जय पांचालीचा गर्जोनी, उद्धरी कृष्णानंदिनी ।।

# चि. सुनील (पप्पू) व सौ. मीनल

## मंगलाष्टक

आधी वंदन श्री गणेश तुजला, ये शारदा देवी ये ।
कुलाचे हरी व्यंकटेश जणी या, माहूरची रेणुके ।।
यावे हो गुरु दत्तराज प्रभुजी, कार्यास या मंगल ।
वर्षा मंगल अक्षता वधुवरा, कुर्यात् ।।१।।

सुनीला तुज आजही वरीतसे, मीना वधू लाजरी ।
प्रेमाची शुभमाळ घेऊनी करी तुज अर्पिण्या साजिरी ।।
प्रीतीच्या मृदुबंध तोल धरूनी टाका पुढे पाऊल ।
वाढो वैभव कीर्ति लोकी पसरो, कुर्यात् ।।२।।

लाभो वैभव संपदा बहु तुम्हा, लाभोत हे सद्गुण ।
साधोनी स्थिर कर्म योग अपुल्या व्हावे गृहा भूषण ।।
सारे सुज्ञ जनांत हेचि कथिती, कीर्ति करा उज्वल ।
हर्षाने वध मोठी आई वदते, कुर्यात् ।।३।।

भाग्याचे यशवंत ही कुमुदिनी, स्नुषा तुम्हा लाभली ।
आली ही सुकुमार सून मिनल, सुखशांतीला घेवोनी ।।
सांचिड्यांत फुलो सदैव तुमच्या, आशिर्वचा देवोनी ।
वदले सर्व पहा सुहास्य वदनें, कुर्यात् ।।४।।

(मागे पहा)

श्रीकृष्णासम हा सुनील बघुनी, माधुरी आनंदली ।
हर्षाने नटूनी पहा उभी असे, सौख्यात ती न्हाली ।।
उभयांचा सुखसोहळा बघुनीया, सिंधु मनी तोषली ।
मोदाने बघ सुधाकर वदे, कुर्यात् ।।६।।

बाळे ! तूं शालिनीची तनया, शालीन राही सदा ।
प्रेमाने सुखवोनी आप्तजन हे, मिळवी सदासंपदा ।।
क्रोधाला विसरुन प्रेम मनी धरा, शांति असू द्या मनी ।
हर्षाने वदती गजानन पिता, कुर्यात् ।।७।।

आहे गोकुळ एकतेत वसुनी, राही सदा निर्भर ।
मांगल्यानी पवित्रता इथे असे, सर्वां मिळे ते अभय ।।
आहे शांति मनी विवेक गृही या कार्या असे तो जय ।
स्मिता आणि मिलिंद वदती, कुर्यात् ।।८।।

२८-१-६०



(५५)

# गौरीहर

गौरीहर पूजिले, सखी ग गौरं हर पूजीले ।।
सौभाग्याचे व्रत आचरले ।।ध्रु।।

भावभक्तीने हरीशी नमिले ।
ठेवी सुखी उभय कुलाते ।।
आजपासूनी गृह कार्याते ।
संसारी सुख सर्व लाभू दे ।।१।।

कन्यादान विधी आज जाहले
योग्य वरासी मज अर्पिले
पतिगृही जाता हृदय दाटले
आशिर्वच मज देई माते ।।२।।

मामा राहील उभा पाठीशी ।
मंगल अक्षत वधुवरांशी
शतायु होवो हीच विनंती ।
ईशा प्रति इच्छिले ।।३।।

(३६)

# विहीण

(चाल – रुसलो ही राधा)

रुसवा न धरावा, विहीणी विनति असे तुम्हा ।।ध्रु।।

सुंदर वर पाहुनी नयना ।
वधू आपुली ही सगुणा ।।
या, घ्या, सांभाळा ।
गृहकामा, शिकवोनी, पुरवा हौसेला ।।१।।

नूतन स्नुषा समजुनी बाळा ।
क्षम्य असावे अपराधाला ।।
हृदयीचा ठेवा दिधला ।।२।।

सांगणेचि तुज न लगे काही ।
वेडी ममता मुळी मन राही ।।
कुशल सदा कळवा ।।३।।

(भागवतात)

## कृष्णाच्या मौंजीचे

कृष्णाच्या व्रतबंध या शुभदिनी,
मथुरापुरी हर्षली ।
आले सर्व आबालवृद्ध मिळूनी,
उत्साह वर्णू किती ।
गाती मंगल गीतिका श्रीहरीला,
वसुदेवाच्या नंदना ।।
झाली सद्गदीत देवकी सती ।
कुर्यात् बटोर्मंगलम् ।।१।।

## कृष्णाचे लग्न

## मंगलाष्टक

लक्ष्मी भगवंत ज्या स्थळी असे, समृद्धी तें लाभली ।
रुक्मिणी सगुणा विदर्भ तनया, कृष्णास ती अर्पिली ।।
झाले मीलन आजच्या शुभदिनी, साक्षी ईशा ठेवोनी ।
व्हावे सावध चित्त शुद्ध करुनी, कुर्यात् ।।१।।

श्रीकृष्णा तुजला अजि मिळतसे, कार्यास वाटेकरी ।
रुक्मिणी सगुणा सुशील वधू ही, दैवे तुला लाभली ।।
प्रेमाने तिजला मान दे झडकरी, पत्नीपदाचा खरा ।
हर्षाने वसुदेव देवकी वदे, कुर्यात् ।।२।।

# कै. सौ. जानकीबाई जलतारे यांना श्रद्धांजली

जलतारे कुलभूषण असे,
श्रीराम संबोधिती ।।
आली जानकी ही गृहलक्ष्मी ।
भाग्याची वर्णु किती ।।
संसारी सुखशांतीचे फुलविले ।
वात्सल्याची देवता ।।
झाली लीन प्रभूपदी सती ।
शांती मिळो तिजला ।।

# श्री दाजीसाहेब जलतारे यांचे सहस्रचंद्रदर्शन प्रसंगी

आश्चर्य झाले माझ्या मनाला ।
नातवांनी केला आनंदा सोहळा ।।
अलभ्य असा हा लाभ जाहला ।
सहस्र दर्शनी चंद्र पाहिला ।
कधी न ऐकीला न देखीला ।
याचे श्रेय नानासाहेबांना ।
जयंत नारायणांनी केल्या गोष्टी ।
बाबूरावची करावी एकसष्टी ।
पैला वसूचा घेतला सल्ला ।
सुनीलराव म्हणाले योग चांगला ।
असं माझं भाग्य सवाई ।
सहकुटुंब आले मुले जावई ।
मुलांनी दिल्या सूचना ।
सद्गुणी आमच्या लेकी सुना ।
असा आनंद झाला केवढा ।
नातू पणतूंनी भरला वाडा ।
अखंड कृपा श्रीगुरूंची ।
इच्छा पुरवी माझ्या मनीची ।।

# श्री दाजीसाहेबांचं घर !

दाजीसाहेबांचं घर जशी चंद्राची कोर।
आल्या सरस्वतीबाई गृहिणी थोर
सरस्वतीबाई बसल्या ओसरी
आली सुहास दुसरी
सुहास सगळ्यांची करते बरोबरी।
आमच्या घरात सुनीता गोरी।
सुनीतानी शिवली नातवाला कुंची
आमच्या घरात शुभदा उंची
शुभदानी केले डोहाळे
सुचिताचे मोठे डोळे

— या झाल्या सुना.

जलताऱ्यांच्या घरात माई गंभीर
आली कुमुद संसाराला खंबीर
कुमुदनी केली पेपरची पहाणी
शिवण कलेत प्रमोद शहाणी

— या झाल्या मुली

जलताऱ्यांच्या नाती आहेत श्रीमंत
रंगात आमची शैला शांत
शैलाच्या घरावर लावले द्राक्ष
आली पद्मा घरात दक्ष
पद्मानी केला हलवा
ड्रॉईंग काढायला वसूला बोलवा
वसूनी काढली पेढ्याची फोड
सर्वात लहान मिटी गाते गोड

— या नाती

दाजीसाहेबांच्या घरांत
पहिला आला वसंत
याची सल्ला,
सर्वांना पसंत ॥१॥

अनंत झाला गुणवंत, सुरेश झाला भगवंत
मोहन प्राध्यापक झाला, चंद्रशेखरनी आनंद केला ॥२॥

## बाबांची एकसष्टी निमित्त आशिर्वाद

अनंत आहे भाग्यवंत
याची एकसष्टी सर्वांना पसंत

वडीलांसम आहे वैभवाचा
आशिर्वाद हा किती अनंताचा

दीर्घायु लाभो अशा पुत्ररत्नाला
हीच विनंती हरिचरणाला ॥१॥

— सौ. आई

# नातू

जलतान्यांचा नातवांत प्रवीण साहेब झाला.
दुसरा जयंता इंजिनियर झाला.
जयंता म्हणतो बांधा बंगला.
आला नारायण फर्स्टक्लास चांगला.

नारायण म्हणतो घ्या नवीन कार.
तबला वादनात आला अमरकुमार.
अमरने उडविली बहार.
गणितामध्ये अजिंक्य हुशार.

अजिंक्य म्हणतो चार अधिक तीन सात.
अमोलला आवडतो केशरी भात.
अमोलचं बोलणं मोठं शुद्ध.
आजोबांना हसवतो अनिरुद्ध.



# चि. सौ. वसुधा व चि. विनोद

## मंगलाष्टक

यावे हो गणनायका शिवसुता, पाचारीले आदरे ।
वीणादेवी सरस्वती भगवती, वैदर्भीची अंबीके ॥
याव्या सर्व मिळोन सुरललना, या मंडपी सत्वरे ।
वर्षा मंगल अक्षता वधु वरा, कुर्यात् ॥१॥

भाग्याची वसुधा विनोद तुजला, सहचारिणी लाभली ।
स्वीकारी सौरत्न गुणी हे, मोदे प्रीती अंतरी ।
झाले मीलन आजच्या शुभदिनी, सरिता मिळे सागरी ।
झाली हर्षित ही पितामही वदे, कुर्यात् ॥२॥

आहे प्रेमळ सासू आणि श्वशूर हे, वसुधा तुझे सत्य की ।
सान्निध्यात रहा विनोदसह तूं, शांति सुखा घेऊनी ॥
संसारी सुखी स्वकुल भूषवी, हर्षित राही सदा ।
ऐसे वदले पितामह तुला, कुर्यात् ॥३॥

वाजे मंजुळ ही सुरेल सनई, लावियले तोरण ।
गाती मंगल गीतिका मधुर ही, व्हावे सदा मंगल ॥
उभयपक्षाचे जमलेत आप्तजन हे, कार्यास या मंगल ।
वदती सर्व पहा सुहास्य वदने, कुर्यात् ॥४॥

आम्ही आजवरी जपोनी दुहिता, आता तुम्हा अर्पिली ।
दोघांचे मन ध्येय एक असू द्या, व्हाया सुखी जीवनी ॥
ठेवा शांति मनी विवेक अपुल्या, चित्ती ईशा त्या स्मरा ।
नांदा सौख्यभरे तुम्ही उभयता, कुर्यात् ॥५॥

# चि. मोहन व सौ. शुभदा

## — यांचे विवाह प्रसंगी —

विश्वेशा तुज प्रार्थना अजि असे द्यावे सवे शा दा ।
याव्या सर्व मिळुनी सुर ललना स्वर्गीय देवांगना ।
आली ही कुलदेवता गुरुजना या मंडपी यावया ।
आशिर्वाद तुम्हा असो वधू वरा, कुर्यात् सदा मंगलम् ।।१।।

सोन्याच्या शुभ पाउली ममगृही आली स्नुषा आज ही ।
विष्णुची ललना क्षिराब्धी तनया शुभदा तशी भासली ।
घेवोनी वरमालिका मृदुकरी पूजीयली अंबिका ।
अर्पी मोहन राजसाय शुभगे, कुर्यात् सदा मंगलम् ।।२।।

# चि. दिनेश देशमुख यांचा पाळणा

निज सुखे शांत जरा झोप घेई राजसा
खचित तुला सांगतसे थोडे ऐक राजसा ॥धृ॥

फिरुनी वसुनी इथे तू आला भाग्यवान मंदीरा
पीता जननी मोदे तुझे कोड पुरवी कौतुका ॥१॥

वाटे कन्हैया कृष्ण सखा गोकुळातला आला ।
त्याच सम तू दावी लीला मिळवी कीर्ती वैभवा ॥२॥

आशिर्वाद दे पीतामहि मोठी काकू राजसा
बंधु भगिनी काकू आत्या गाती गोड पाळणा ॥३॥

राखी धर्म होई शूर सांगते तुजी आत्या
कृष्ण तनया दिनेश ईशा ठेव सुखे बालका ॥४॥

# पणतु (प्रतिक)

सुवर्णांची फुले वेचुनी धन्य जगी झाले ।

पणतु माझा 'प्रतिक' साजिरा पणजी मी झाले ।

भाग्याचा हा कळस साजिरा संसारा शोभे ।

काय ईश्वरा मागु तुजला सर्व मला पावले ।



(८७)

# पणतु

आनंदाचा सुदिन आला ।

वंश वृद्धीला पणतु झाला ।

भाग्यवान आम्ही पणजी अन पणजोबा ।

आशिर्वाद देतो 'प्रतिका'ला ।



(६८)

# डोहाळे

पति पुछने लगे पत्नीसे, क्या दिल चाहता बोलो मुझसे
जो कुछ आवे तेरे मनिसे, भारतको हितकारी तुम जल्दी बोलो नारी

सुनोजी सुनोजी अब दिलकी बात हमारी ।।ध्रु।।

ना मुझे चलना बागबगिचा, ना लगे अच्छा खानापिना
फिकीर लगी है इस दुनियकी सज्जनके हितकारी ना देर लगावे मुरारी

बहुत बित गये दिन अबतक क्यूं नहि लौटे जगन्नायक
तडप रहे है नयन हमारे, जल्दी आवे मुरारी मैं माता बनूंगी तेरी

बहुत विपद् थी गोब्राम्हणपर शिवाजी रुपमें आए भूपर
जब यवनोंको संहारे, सुखी करे नरनारी ऐसी आस है मनकी मेरी

शुभदिनी जन्मा आये बालक, कृष्णातनया गाए ये गीत
उभयकुलोंमे आनंद दिलाओ, फिरसे स्वराज्य टिकाओ
अपने देशकी शान बढाओ ।।५।।